| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |

**प्रेस नोट क्र. १४३** **दिनांक ०३/०६/२०२१**

## सृष्टी, सेक्टर ०१, मिरारोड पुर्व येथे खुन करुन फरार झालेल्या मुख्य आरोपीस काशिमीरा पोलीस स्टेशनकडुन अटक

फिर्यादी श्री. मान उदय सिंग वय-६१ वर्षे हे कुंभा बिल्डींग, सेक्टर १, सृष्टी, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे येथे रहावयास असून आरोपीत सुभाष बिजली पांडे व अमित रंजितकुमार सौरव ऊर्फ तिवारी हे सदर सोसायटीमध्ये वॉचमन म्हणुन कामास होते. फिर्यादी यांचा मुलगा अभिषेक मान सिंग, वय-१९ वर्षे याचे आरोपीत वॉचमन यांचेबरोबर दोन दिवसांपुर्वी पिण्याचे पाणी मागण्याच्या कारणावरुन वाद झाला होता. सदर गोष्टीचा आरोपीत यांनी मनात राग धरुन दिनांक २९/०५/२०२१ रोजी ००.३० वाजता मयत अभिषेक सिंग हा राहते सोसायटीच्या गेटवर आला असता, आरोपीत यांनी त्यास शिवीगाळ व दमदाटी करुन धारदार हत्याराने छातीवर, पोटावर, डाब्या पायावर वार करुन गंभीर स्वरुपाचे दुखापती करुन जीवे ठार मारले म्हणुन काशिमीरा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क्र. I ४१२/२०२१ भादंविसक ३०२, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचे तपासात यापुर्वी आरोपी सुभाष बिजली पांडे, वय-५६ वर्षे यास अटक करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयातील मुख्य आरोपी अमित रंजितकुमार सौरभ ऊर्फ तिवारी वय-४३ वर्षे हा घटनास्थळावरुन खुन करुन पळुन गेला होता. सदर गुन्हयात तांत्रीक माहीतीचे आधारे मुख्य आरोपी हा जुहु, मुंबई येथे असल्याचे माहिती प्राप्त झाल्याने त्यास लागलीच ताब्यात घेवुन दि ०३/०६/२०२१ रोजी अटक करण्यात आलेली आहे. मुख्य आरोपी अमित रंजितकुमार सौरभ ऊर्फ तिवारी याचेविरुध्द यापुर्वी सन २००५ मध्ये जुहु पोलीस स्टेशन, मुंबई शहर येथे खुनाचा प्रयत्न केलाबाबत गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात त्यास ७ वर्षाची शिक्षा लागली होती व तो सदरची शिक्षा भोगून बाहेर आलेला असल्याची माहीती प्राप्त झालेली आहे.

सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-०१, श्री. विलास सानप, सहा.पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संजय हजारे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस स्टेशन, सपोनी. गणेश भामरे, महेंद्र भामरे, प्रशांत गागुर्डे, पोलीस उपनिरीक्षक जावेद मुल्ला व काशिमीरा पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

------oooo------